# जाहिरात

धुळे महानगरपालिका धुळे या कार्यालयामध्ये **"लिपीक-टंकलेखक"** या पदावर ०६ महिने कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करावयाची आहे.

त्याअनुषंगाने इच्छुक उमेदवरांनाकडून दि. १७/११/२०२५ ते दि. २६/११/२०२५ या कालावधीत ऑफलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | एकत्रित मासिक मानधन | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | लिपीक-टंकलेखक | २५ | रु.१५,०००/-<br>(इतर वेतन व भत्ते अनुज्ञेय नाही) | किमान १८ व<br>कमाल ३८ |

**लिपीक टंकलेखक पदाकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता**

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.

ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखक ३० श.प्र.मि. (जी.सी.सी.) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुबंई यांचे कडील अधिकृत M.S.C.I.T. किंवा D.O.E.A. C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C. C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

ड) मराठी, हिंदी, वाचता लिहीता व बोलता येणे आवश्यक.

**निवड**

१. लिपीक-टंकलेखक कंत्राटी यांची निवड पदवी परिक्षेत मिळालेल्या गुणांकन तत्वावर राहील.
२. टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि., इंग्रजी ४० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र व MSCIT अनिवार्य राहील.
३. गुणांकनानुसार निवडयादी तयार करण्यात येईल.
४. आयुक्त हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

**गुणांकन पध्दत**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **गुण** |
|---|---|---|
| १ | लिपीक टंकलेखक चे पदाकरिता असलेल्या शैक्षणिक अर्हता म्हणजेच कोणत्याही शाखेतील पदवीच्या शेवटच्या वर्षातील टक्केवारी | ५०% |
| २ | टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि. टक्केवारी | २०% |
| ३ | टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मि. टक्केवारी | २०% |
| ४ | MSCIT गुणांच्या | १०% |

**खालीलप्रमाणे अटी व शर्तीवर नियुक्ती करण्यात येईल**

१. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल, त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून दर्जा असणार नाही.
२. सदर नेमणुका करार पध्दतीने ६ महिन्यांसाठी करण्यात येईल. आदेशाच्या दिनांकापासून ६ महिने पूर्ण झाल्यानंतर विनानोटीस नियुक्ती संपुष्ठात येईल.
३. संबधित नियुक्ती प्राधिकारी महानगरपालिकेच्या वतीने नियुक्तीच्यावेळी संबधितांबरोबर विहीत प्रपत्रात करार करतील कराराचे विहीत प्रपत्र परिशिष्ट अ मध्ये देण्यात आले आहे कराराची सर्व कागदपत्रे जतन करुन ठेवणे ही संबंधीत कार्यालयाची जवाबदारी असेल.
४. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या कर्मचा-यांना एकत्रित मानधन व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.
५. शासन व महानगरपालिका वेळोवेळी सुधारीत करेल अशा अटी व शर्ती आपणास लागू राहतील.
६. प्राप्त होणाऱ्या अर्जाची छानणी करुन धुळे महानगरपालिका, धुळे येथील नोटीस बोर्डावर व वेबसाईटवर पात्र/अपात्र उमेदवाराची यादी प्रसिध्द करण्यात येईल.

७. सदर कंत्राटी नियुक्ती नंतर कायम सेवेत सामावून घेणेबाबत मे.न्यायालयात अथवा इतर सक्षम प्राधिकारणाकडे दाद मागता येणार नाही.
८. नियुक्ती प्राधिकारी यांना आपल्या नियुक्तीबाबत व कामकाजाबाबत शंका / तक्रार / हरकत प्राप्त झाल्यास आपली नियुक्ती संपूष्टात आणण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील.

**आवश्यक कागदपत्र**

१. विहीत नमुन्यातील अर्ज.
२. पासपोर्ट साईज फोटो (रंगीत, २ प्रती)
३. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र.
४. जन्म तारखेचा पुरावा.
५. आधार कार्ड. (स्वयं साक्षांकित)
६. कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण शैक्षणिक अर्हतेचा पुरावा. (स्वयं साक्षांकित)
७. टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र
८. टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मि. उत्तीर्ण प्रमाणपत्र
९. MSCIT प्रमाणपत्र

**अर्ज सादर करण्याची प्रक्रीया**

१. उमेदवाराने https://dhulecorporation.org या वेबासाईटवरुन अर्जाचा नमूद डाऊनलोड करुन. हार्डकॉपी मध्ये अर्ज भरुन आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रासह धुळे महानगरपालिका, धुळे (मुख्य टपाल शाखा) येथे अर्ज जमा करावा. (अन्य मार्गाने पाठविलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही).

**खालील प्रकाराचे अर्ज सदोष गणले जातील व त्यांचा विचार करण्यात येणार नाही. -**

१. विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त न करणारे व विहीत नमुन्या नसलेले अर्ज.
२. अर्जात मजकूर चुकीचा किंवा अपूर्ण भरलेले अर्ज
३. स्वाक्षरी नसलेले अर्ज
४. ओळखपत्र म्हणून आधार कार्डची स्वसाक्षांकीत छायांकीत प्रत नसलेला अर्ज
५. अर्ज स्विकृतीचा शेवटचा दिनांक २६/११/२०२५ रोजी सायंकाळी ५-४५ असल्याने त्यानंतर कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज (अन्य आपत्कालीन परिस्थितीमुळे)
६. अन्य मार्गाने पाठविलेले अर्ज
७. एकदा नाकारण्यात आलेल्या अर्जाबाबत पुर्नविचार केला जाणार नाही. त्यासंबंधी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल धुळे महानगरपालिका कार्यालयाकडून घेतली जाणार नाही.
८. उमेदवाराचे छायाचित्र (फोटो) साक्षांकित केलेले नसल्यास.
९. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या / प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकीत प्रती नसलेले अर्ज.

विहीत किमान अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात व वरील आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज मागविण्यात येत असून, अर्जदार हा पात्र असल्यास त्यांनी दिनांक २६/११/२०२५ सायंकाळी ५-४५ पावेतो प्रक्रीया पूर्ण करावी.

अर्जाचा नमूना https://dhulecorporation.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर नमुना Download करून त्या नमुन्यात अर्ज करण्यात यावा.

सदर पदांची निवड यादी https://dhulecorporation.org या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.

**ठिकाण** — धुळे
**दिनांक** — १७/११/२०२५
**(मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने)**

**करुणा डहाळे**
**अतिरिक्त आयुक्त**
**धुळे महानगरपालिका**